## निशाण क्र. ११६ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दाव्यामध्ये दुरूस्ती करणेस परवानगी मिळणेकरिता दाखल केला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार, सदर दाव्याचे कामी प्रतिवादी क्र. ३० सदाशिव शिवराम ठुकरूल हे दि. ०२/१०/२०१८ रोजी व प्रतिवादी क्र. ३३ सावित्री शिवराम ठुकरूल ही दि. ०५/१०/२०१८ इ. रोजी मयत झालेले आहेत. दावा मिळकतीच्या सातबारा उतारा सदरी त्यांची नावे असल्यामुळे त्यांना नाममात्र पक्षकार केले आहे. त्यांच्याविरूध्द कोणतीही दाद मागितली नाही. अथवा त्यांच्यासोबत वादीचा वाद नाही. सबब सदर प्रतिवादी क्र. ३० व ३३ यांचे नाव दाव्यातून कमी करण्यास व त्याप्रमाणे दाव्यात दुरूस्ती करणेस परवानगी मिळावी अशी वादीने विनंती केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी योग्य तो आदेश पारीत करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. वादी, प्रतिवादी तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

४. प्रतिवादी क्र. ३० सदाशिव शिवराम ठुकरूल हे दि. ०२/१०/२०१८ रोजी व प्रतिवादी क्र. ३३ सावित्री शिवराम ठुकरूल ही दि. ०५/१०/२०१८ इ. रोजी मयत झालेले आहेत, वादीने त्यांना नाममात्र पक्षकार केले होते याबाबत उभय पक्षकारामंध्ये वाद दिसून येत नाही. प्रस्तूत दाव्यामध्ये केवळ प्रतिवादी क्र. १ व २ यांच्याविरूध्द दाद मागितली आहे. सबब या दाव्यामध्ये मयत झालेल्या पक्षकारांची नावे कमी करणे आवश्यक वाटते. त्यामुळे प्रस्तूतच्या दुरूस्तीस परवानगी देणे न्यायोचित वाटते. सबब प्रस्तुतचा

अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे असे मला वाटते. परिणामी मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने पुढील तारखेपर्यंत दाव्यामध्ये दुरूस्ती करून दाव्याची दुरूस्त प्रत दयावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/—
( गि.सु.माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

स्थळ : देवगड
दिनांक: १४/०२/२०१९